Literacy for a Billion

Movie: Balirajache Rajya Yeu De
Year: 2008

Song: Hyo Hyo Hyo Pavhana
Lyricist: Arun Kachare

घोटाळा
घोटाळा घोटाळा घोटाळा
घोटाळा घोटाळा घोटाळा
ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा
तुझा बघ मेव्हणा
हे ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा
तुझा बघ मेव्हणा
डोळा कसा मलाच मारतोय गं
मारतोय गं मारतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं
ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा
तुझा बघ मेव्हणा
डोळा कसा मलाच मारतोय गं
मारतोय गं मारतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं
ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा
तुझा बघ मेव्हणा
डोळा कसा हिलाच मारतोय गं
मारतोय गं मारतोय गं
ए पाव्हणं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं

बिन इरोध निवडून आला गं
हा गावचा पुढारी झाला गं
बिन इरोध निवडून आला गं
हा गावचा पुढारी झाला गं
ह्यानं केसानं गळा कापला गं
गाव सारा घशात घातला गं
आसं का
ह्यो ह्यो ह्यो लांडगा
गडी बघ दांडगा
ह्यो ह्यो ह्यो लांडगा
गडी बघ दांडगा
मेंढराच्या कळपात घुसतोय गं
घुसतोय गं घुसतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं

चष्मेवाला टोपीवाला टायवाला कोटवाला
लई लई शायनिंग मारतोय गं
मारतोय गं मारतोय गं
ए पाव्हणं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं

घोटाळा घोटाळा घोटाळा
घोटाळा घोटाळा घोटाळा

रस्त्यात खड्डा खड्डयात रस्ता
नाही जनतेची कुणाला आस्था
रस्त्यात खड्डा खड्डयात रस्ता
नाही जनतेची कुणाला आस्था
इथं गाव सारं काढतोया खस्ता
दावी पैशाचा रूबाब नुस्ता
ह्यो ह्यो ह्यो टोणगा

PlanetRead

Literacy for a Billion

गडी बघ उंडगा
हे ह्यो ह्यो ह्यो टोणगा
गडी बघ उंडगा
म्हशीचा गोठ्यात शिरतोय गं
शिरतोय गं शिरतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं

आमदार खासदार नामदार फौजदार
साऱ्यांना हाताशी धरतोय गं
धरतोय गं धरतोय गं
ए पाव्हणं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं

सरकारी योजना आणल्या गं
कागदोपत्रीच नुकत्या रंगल्या गं
सरकारी योजना आणल्या गं
कागदोपत्रीच नुकत्या रंगल्या गं
गुपचूप साऱ्या गिळल्या गं
मतदाराला नाही त्या कळल्या गं
ह्यो ह्यो ह्यो बांडगा
गडी बघ हांडगा
हे ह्यो ह्यो ह्यो बांडगा
गडी बघ हांडगा
त्वांड दडवून कसा लपतोय गं
लपतोय गं लपतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं
ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा
तुझा बघ मेव्हणा
डोळा कसा मलाच मारतोय गं
मारतोय गं मारतोय गं
ह्यो पाव्हणा
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं
नको तिथं घोटाळा करतोय गं
पाव्हणा नको तिथं घोटाळा करतोय गं
घोटाळा घोटाळा घोटाळा
घोटाळा घोटाळा घोटाळा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*